
# चार मिनिटांची बोअर वाहू लागली ११ तास

## देऊर कॉलेजच्या प्रकल्पाची किमया : जलसंधारणात घडवली क्रांती

सातारा : योगेश चौगुले

कोरेगाव तालुक्यातील देऊर येथील प्रा. संभाजीराव कदम महाविद्यालयाने राबवलेल्या रेन हार्वेस्टींग व बोअरवेल रिचार्जच्या अनोख्या उपक्रमाने जलसंधारणात क्रांती घडवली आहे. महाराष्ट्रात आगळ्या वेगळ्या ठरलेल्या या उपक्रमाने अवघी तीन ते चार मिनिटे चालणारी बोअर चक्क धो धो भरून वाहू लागली आहे. ११-११ तास पाणी आता उपलब्ध झाले आहे. कायम दुष्काळी असलेल्या कोरेगावच्या उत्तर भागात ही किमया झाली आहे.

कोरेगाव तालुक्याच्या उत्तर भागाला दुष्काळाचा कलंक आहे.



देऊर महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी राबवलेल्या या उपक्रमाने जलसंधारणात मोठी क्रांती घडून आली.

येथील अनेक गावे दरवर्षीच टंचाईने होरपळून जातात. या गावांची, येथील जनतेची टंचाई व दुष्काळामुळे होणारी तडफड वर्षानुवर्षे असह्य करत आहे. याच भागातील देऊरच्या मुधाईदेवी शिक्षण संस्थेचे प्रा. संभाजीराव कदम महाविद्यालय विविध सामाजिक उपक्रम राबवण्यात आघाडीवर राहिले आहे. आपल्या भागाची होणारी होरपळ मनाला डागण्या देत असल्याने काही तरी विधायक करून दाखवण्याच्या व दुष्काळात पिचलेल्या जनतेच्या हितासाठी या महाविद्यालयाने अनोखा उपक्रम राबवला आहे. संस्थेचे विश्वस्त अरविंद कदम व प्राचार्य भारत भोसले यांच्या संकल्पनेतून रेन हार्वेस्टींग व बोअरवेल रिचार्ज हा नाविन्यपूर्ण उपक्रम समोर आला आहे. दहिगाव, पळशी, पिंपोडे खुर्द, देऊर व आर्दकी खुर्द या गावांची भुगर्भातील पाणी पातळी वाढवण्याच्या दृष्टिकोणातून या उपक्रमांतर्गत विविध कामे महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेतील विद्यार्थ्यांनी सुरु केली आहेत. त्यानुसार बंद पडलेल्या बोअरचा सर्व्हे करण्यात आला. त्यानंतर विद्यार्थ्यांनी पावसाचे वाहून जाणारे पाणी अडवण्याच्या दृष्टीने या गावात जनजागृती केली त्याचबरोबर हे पाणी त्याच ठिकाणी जमीनीत मुरवून भूगर्भातील पाण्याची पातळी वाढवण्याचा प्रयत्न केला आहे. महाविद्यालयाने सामाजिक पातळीवर राबवलेला हा प्रकल्प महाराष्ट्रातील एक आगळावेगळा प्रकल्प आहे.

**प्रकल्प ठरतोय मैलाचा दगड**

प्रा. संभाजीराव कदम महाविद्यालयाने जलसंधारणाचा विडा उचलला आहे. सामाजिक बांधिलकी जोपासणाऱ्या या महाविद्यालयाने दहिगाव, पळशी, पिंपोडे खुर्द, देऊर व आर्दकी खुर्द या गावात रेन हार्वेस्टींग व बोअरवेल रिचार्जचे काम हाती घेतले आहे. हा महाराष्ट्रातील एक आगळावेगळा उपक्रम असून जलसंधारणात तो मैलाचा दगड ठरत आहे.



“ महाविद्यालयाच्या माध्यमातून राबवण्यात आलेल्या या प्रकल्पांतर्गत कोरेगाव तालुक्यातील दहिगाव येथे सर्व्हे करुन तीन बोअरवेलची निवड केली. भूगर्भातील पाणी पातळी कमी झाल्याने या बोअरवेलला तुरळक प्रमाणात पाणी येत होते. महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेतील विद्यार्थ्यांनी घराच्या छतावरील वाहून जाणारे पावसाचे पाणी पन्हाळ व पाईपच्या सहाय्याने बोअरलगत जमिनीत मुरवले. हे पाणी जमीनीत मुरवल्याने भूगर्भातील पाणी पातळी वाढण्यास मदत झाल्याने ३-४ मिनिटे चालणारे बोअरवेलचे पाणी आता सलग ११ तास चालत आहे.

\- **अरविंद कदम**, विश्वस्त, मुधाई देवी शिक्षण संस्था, देऊर

/

## TRANSLATED

**Four - minutes Bore well began to flow for 11 hours.**
**Alchemy of Dear College Project: Revolution in water conservation.**

Satara: Yogesh chowgule.

The unique initiative of Rain water Harvesting and Bore well recharge implemented Prof. Sambhajiro Kadam college, Deur has revolutioned water conservation. Now bore well supports for 11 hours continuously.

Nothern part of Koregaon Taluka is under Drought area. Every year many villages of this area faces water insufficiency.

Deur's shri Mudhaidevi shikshan Santha's Prof. Sambhajirao Kudam College has been in the forefront in implementing various social activities. College has nun many supportive activities for this suffering society people. Among it, college Principal Dr. Bharat Bhosale's concept of Rain Water Harvesting and Bore well Recharge is an innovative Venture.

With a view to increase the ground water level in surrounding villages like Dahigaon, Palashi, Pimpode Khurd, Adarki Khurd, & Deur various works have been started by the students under the National Service Scheme of the college. After that the students created awareness in the village with a view to stop the flow of rain water and also try to increase the ground water level by using this water in the ground out the same place. This project implemented by the college at the social level is a unique project in Maharashtra.

Prof. Sambhajirao kadam college has taken up the task of water conservation. Cultivating social commitment, the college has undertaken the work of Rain Water Harvesting and Bore well Recharge in Dahigaon, Palashi, Pimpode Khurd, Deur and Adarki khurd. It is a great milestone in later conservation in Maharashtra. State.

Under this project implemented through the college, three bore wells were selected by conducting a survey at Dahigaon in Koregaon taluka. Due to low ground water level, these bore wells were getting sparse amount of water. Students of the National Service Scheme of the college used rainwater runoff and pipes from the roof of the house to bury the soil in the borehole. The water from the bore well, which used to run for 3-4 minutes, is now running for 11 hours straight, as it helps to raise the groundwater level.

\- Arvind Kadam, Trustee, Shri Mudhaidevi Educational Institution, Deur

Dr. B. N. Bhosale
Principal,
Prof. Sambhajirao Kadam College,
Deur, Tal. Koregaon, Dist. Satara.

# कोव्हिडसाठी देऊरला आयसोलेशन सेंटर

## ग्रामपंचायतीच्या प्रयत्नांना महाविद्यालयाची साथ

वार्ताहर
कोरेगाव

कोरोनाच्या भीषण महामारीत प्रशासनाने सुरु केलेल्या कोविड लढ्यात आता महाविद्यालयानी ही पुढाकार घेतला आहे. स्थानिक पातळीवर जनजागृतीसोबत प्रत्यक्ष कोरोना रुग्णांसाठी विलगीकरण कक्ष सुरु करून समाजासाठी देऊर ग्रामपंचायतीच्या प्रयत्नांना भक्कम साथ देत कोविड लढ्याला बळकटी दिली आहे.



देऊर : विलगीकरण कक्षाचे उद्घाटन करताना आमदार महेश शिंदे, डॉ. रुपाली जाधव, चेअरमन धनसिंग कदम, राहुल कदम व इतर.

देऊरच्या श्री मुधाईदेवी शिक्षण संस्थेच्या प्रा. संभाजीराव कदम महाविद्यालयाने आपली सामाजिक बांधिलकी जपत कोरोना आपत्तीच्या काळात कोरोना दक्षता ग्रामसमिती, ग्रामपंचायत देऊर यांच्या संयुक्त विद्यमाने देऊर येथे कोरोना विलगीकरण कक्ष स्थापना केला. सामाजिक जबाबदारीच्या भावनेतून स्थापन केलेल्या या कोरोना विलगीकरण कक्षाचे उद्घाटन कोरेगाव मतदार संघाचे आमदार महेश शिंदे यांच्या हस्ते झाले.

यावेळी बोलताना आमदार महेश शिंदे यांनी महाविद्यालय आणि देऊर ग्रामपंचायत यांनी संयुक्तपणे सुरु केलेला हा विलगीकरण कक्ष काळाची नितांत गरज आहे. यावेळी श्री मुधाईदेवी शिक्षण संस्थेचे चेअरमन धनसिंग कदम, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. भारत भोसले, माजी जिल्हा परिषद सदस्य राहुल कदम, देऊरचे सरपंच शामराव कदम, उपसरपंच श्रीधर कदम, देऊर जिल्हा परिषद प्राथमिक आरोग्य उपकेंद्राच्या डॉक्टर पूजा गोरे, आरोग्य परिचारिका मनिषा जाधव, आरोग्य कर्मचारी, महाविद्यालयाचे प्राध्यापक व प्रशासकीय कर्मचारी उपस्थित होते.

**TRANSLATED**

**COVID-19 Isolation centre in Deur**
**College support to Gram Panchayat's efforts**

Prof. Sambhajirao Kadam College has taken (played) a great part in Government's campaign against Covid-19 calamity. College has starred direct corantine centre for Covid patients in collaboration with Deur Gram Panchayat.

Deur's shri mudhaidevi shikshan Sanstha's Prof. Sambhajirao Kadam College, Deur, with collaboration with Gram Panchayat's vigilance committee started couid-19 corantine centre. Koregaon Assembli's MLA Mahesh Shinde inaugurated corona Separation cell.

Speaking on the occasion, MLA Mahesh Shinde said that this seperation cell jointly starred by the college and Deur Gram panchayat is a need of time..

On this occasion, chairman of shri Mudhaidevi shikshan santha phansingh Kadam, Principal of the college Dr. Bharat Bhosale, former Zilla Parishad member Rahul Kadam, Deur Gram panchayat sarpanch Shamrao Kadam, Deputy sarpanch Shridhar Kadam, Deur Zilla Parishad Primary Health Sub centre Doctor Pooja Gore, Health Nurse Manisha Jadhav, health workers, college Professors & administrative staff were present.



Deur: While inaugurating the segregation cell, MLA Mahesh Shinde, Dr. Rupali Jadhav, Chairman Dhansingh Kadam, Rahul Kadam and others.

Dr. B. N. Bhosale
Principal,
Prof. Sambhajirao Kadam College,
Deur, Tal. Koregaon, Dist. Satara